अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड


## अटीतटीच्या सामन्यात लखनौचा मुंबईवर विजय

**लखनौ** : आयपीएल २०२४ मधील मुंबई इंडियन्सची स्थिती अधिक खराब झाली आहे. मुंबईला सातव्या पराभवाचा सामना करावा लागलाय. लखनौविरोधात आज झालेल्या सामन्यात मुंबईचा चार विकेटने पराभव झाला. या पराभवामुळे मुंबईचे प्लेऑफमधील आव्हान अधीक खडतर झालेय. मुंबई आणि आरसीबी आता एकाच जहाजात आहेत.

कारण, दोन्ही संघाचे दहा सामन्यात प्रत्येकी सहा सहा गुण आहेत. प्लेऑफमध्ये पोहचण्यासाठी आता दोन्ही संघाला उर्वरित सर्व सामन्यात विजय गरजेचा आहे. त्याशिवाय इतर संघाच्या कामगिरीवरही अवलंबून रहावे लागेल.

मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना % विकेटच्या मोबदल्यात १४४ धावांपर्यंत मजल मारली होती. मुंबईकडून नेहाल वढेरा यानं ४५ तर टीम डेविड यानं ३५ धावांची खेळी केली होती. इतर फलंदाजांनी नांगी टाकली होती. मुंबईने दिलेले १४५ धावांचे आव्हान लखनौने ६ विकेटच्या मोबदल्यात पार केलेय. लखनौकडून मार्कस स्टॉयनिस यानं शानादर अर्धशतक ठोकलं. त्याला केएल राहुल, दीपक हुड्डा आणि निकोलस पूरन यांनी शानदार साथ दिली.

मुंबईने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना लखनौची सुरुवात खराब झाली. पहिल्याच षटकात युवा अर्शिन कुलकर्णी गोल्डन डकचा शिकार झाला. पण त्यानंतर केएल राहुल आणि मार्कस स्टॉयनिस यांनी लखनौचा डाव सावरला. दोघांनी अर्धशतकी भागिदारी करत धावसंख्या वाढवली.





## विरोधकांकडून फेक व्हिडीओचा समाज माध्यमांत गैरवापर : मोदी

**धाराशिव** : भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारला पराभूत न करू शकणारे विरोधक तंत्रज्ञानाचा गैरवापर करत समाज माध्यमांत फेक व्हिडिओ प्रसारीत करत आहेत, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केला.


महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारसभेत पंतप्रधान बोलत होते. ते म्हणाले, आता त्यांची स्थिती अशी आहे की त्यांचे खोटे काम करत नाही, ते माझा फोटो वापरतात आणि आर्टीफिशल इंटिलिजन्सच्या मदतीने त्यांच्या 'मोहोब्बत की दुकान'मध्ये फेक व्हिडिओ विकतात. हे दुकान बंद करायलाच पाहिजे.

विरोधक माझ्यासारख्या नेत्यांची वाक्ये आर्टिफिशल इंटिलिजन्सचा वापर करून बदलतात, असा आरोप त्यांनी केला. आपल्या सरकारने बाजरी जगभर लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न केले, या मुद्द्यावर त्यांनी जोर दिला. जगभरातील प्रत्येक जेवणाच्या ताटापर्यंत बाजरी पोहोचवण्यासाठी मी प्रयत्न केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या सन्मानार्थ दिलेल्या शाही मेजवानीत मी त्याचा समावेश केला होता, अशी पुस्ती त्यांनी जोडली.

आपल्या सरकारने तेलबीयांच्या उत्पादनात भारताला स्वयंपूर्ण करण्याचे ध्येय ठेवले असल्याचे सांगून मोदी म्हणाले, अगामी लोकसभा निवडणूक ही देशाच्या स्वाभीमानाची निवडणूक आहे. कोणतेही कमजोर सरकार, कोणत्याही क्षणी कोसळू शकणारे सरकार मजबूत देश बनवू शकेला का? असा सवाल त्यांनी केला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



दरवर्षी झाड लावायचं राहून जातं !

कल्याण
568-92-138

मुंबई
358-66-178


## सोलापुरात उष्णतेची लाट

**सोलापूर/प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत राजकीय पक्षांचा प्रचार शिगेला पोहोचल्यामुळे सोलापुरात वातावरण तापले असताना उष्णतेची लाट आली आहे. मंगळवारी ४४ अंश सेल्सियसपर्यंत तापमानाचा पारा वाढला होता. यंदाच्या उन्हाळ्यात हे सर्वोच्च तापमान मानले जाते.

गेल्या आठवड्यापासून सोलापुरातील तापमान पुन्हा वाढत असताना गेल्या रविवारी, २८ एप्रिल रोजी तापमान ४३.७ अंशांवर गेले होते. एकीकडे लोकसभा निवडणुकीत प्रचाराची रणधुमाळी वाढल्यामुळे राजकीय वातावरण तापले असताना दुसरीकडे अंगाची लाही लाही करणाऱ्या उन्हाळ्यात तापमानाचा

**तापमान**




पारा उत्तरोत्तर वाढले आहे. अशा तप्त वातावरणात गेल्या सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भरदुपारी तळपत्या उन्हात होम मैदानावर जाहीर सभा झाली होती. त्यानंतर मंगळवारी दुसर्या दिवशी तापमानाचा पारा आणखी पुढे सरकत तब्बल ४४ आंशांवर पोहोचल्यामुळे प्रचंड उष्मा अधिक त्रासदायक ठरला आहे. सकाळी नऊपासूनच उन्हाचे असह्य चटके सहन करावे लागत असून दुपारी रस्त्यावरील वर्दळ रोडावली आहे. बाजारपेठांमध्ये उन्हाच्या त्रासापासून बचाव करण्यासाठी रस्त्यावर ग्रीन नेटच्या पडद्यांचे मंडप उभारले जात आहेत. डोक्यावर टोपी, पांढरे गमजे घालून फिरावे लागत आहे. तर महिलांना तोंडावर स्कार्फ लावून उन्हाच्या तडाख्यापासून बचाव करावा लागत आहे. घरात, कार्यालयात २४ तास विद्युत पंख्यापेक्षा कुलर, वातानुलित यंत्रांचा वापर करावा लागत आहे. रात्री घराच्या गच्चीवर झोपतानाही वारा खेळत नसल्यामुळे उष्णतेची धग बेचैन करीत आहे. लहान मुले झोपेतून दचकून जागे होत आहेत.

**सुराज्य** सोलापूर

### उद्या अंक नाही

**सुराज्य कार्यालयास बुधवार दि.१ मे २०२४ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सुट्टी असल्यामुळे गुरुवार दि.२ मे २०२४ चा अंक प्रकाशित होणार नाही, याची कृपया वाचक, जाहिरातदार, विक्रेते यांनी नोंद घ्यावी.**

**- सरव्यवस्थापक**





## बाप गेला की पोरगा या धोरणाला मुठमाती द्या

### आ. गोपीचंद पडळकर यांचे आवाहन

**सोलापूर/प्रतिनिधी**

माढ्याच्या लढाईत एका बाजूला प्रस्थापित आहेत. बाप गेला की पोरगा आणि पोरगा गेला की नातू. पोरगा आहे तोपर्यंत पुतण्या हे महाराष्ट्राचे धोरण राज्याचे चालू आहे त्याला मुठमाती देण्यासाठी सर्वांनी खा.रणजितसिंह निंबाळकर यांच्या मागे उभे रहावे, असे आवाहन धनगर समाजाचे नेते आ.गोपीचंद पडळकर यांनी केले.

माळशिरस येथील मोदी यांच्या सभेत पडळकर यांनी पवारांवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, पवार यांनी फक्त जाती जातीमध्ये भांडण लावले. ते २००९ मध्ये तर २०१४ मध्ये विजयसिंह मोहिते पाटील माढ्यातून खासदार झाले. त्यांच्यापेक्षा जास्त काम खा. निंबाळकर यांनी केले. मोहिते पाटील हे अनेक वर्ष सत्तेत होते, मात्र त्यांनी कोणतेही काम सांगण्यासारखे केले नाही. या उलट मोदी पंतप्रधान आणि फडणवीस मुख्यमंत्री झाल्यावर गोरेगाव, माण, फलटण, सांगोल्यासह राज्यातील दुष्काळी भागाचा कलंक पुसण्याचा काम भाजपाने केले आहे. बारामतीकरांनी हे कधी केले नाही. त्यांनी कायम आपल्या राजकारणाचा विचार केला. जाती जातीत तेढ निर्माण केले.

### काठी-घोंगडे चालत नाही मत कसे चालते

दोन दिवसांपूर्वी शरद पवार फलटण येथे गेले होते. त्यावेळी धनगर समाजाने त्यांना काठी-घोंगडे दिले, त्यावेळी त्यांनी ते स्वीकारले नाही. काठी घोंगडे चालत नाही मग आमचे मत कसं चालते असा प्रश्न करत धनगर समाजाने आता त्यांना मत देऊ नये असे आवाहन पडळकर यांनी केले.

महायुती सरकारने अहमदनगरचे नाव बदलून अहिल्यादेवी नगर केले. सोलापूर विद्यापीठला अहिल्यादेवींचे नाव दिले. त्यामुळे आता आपण महायुतीच्या मागे उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे, असेही पडळकर म्हणाले.





प्रकाशक - नरेंद्र गोविंद काळे

